

निसर्ग निसर्गच राहू द्या ! मानवाच्या विकासाच्या गर्वाला

निसर्गाने दिलेला हा धोक्याचा इशारा आहे पान 2

दैनिक अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com

॥ आजचा सुविचार ॥

जो प्रतीकुल लोकमताला घाबरून जात नाही,

दुसऱ्यांचे हातचे बाहुले न होण्या ईतकी बुद्धी ठेवतात,

स्वाभिमान ज्याला आहे, तोच माणूस स्वतंत्र आहे असे मी समजतो.

– डॉ.बाबासाहेब आंबेडकर

वर्ष : ०६ | अंक : १९, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, बुधवार, दि.०२ सप्टेंबर २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# महाराष्ट्राच्या राजकारणात पडद्यामागे घडामोडी

## एकनाथ शिंदे अचानक दिल्ली दौऱ्यावर

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०१, मुंबई :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे आज दिल्ली दौऱ्यावर गेले आहेत. ते दिल्लीत दाखलदेखील झाले आहेत. विशेष म्हणजे आज राज्य मंत्रिमंडळाची बैठक पार पडली. ही मंत्रिमंडळ बैठक सोडून एकनाथ शिंदे दिल्लीला रवाना झाले. दिल्लीत दाखल होताच एकनाथ शिंदे यांनी माध्यमांना प्रतिक्रिया दिली. यावेळी त्यांनी दिल्ली दौऱ्यामागचं कारण सांगितलं. सुप्रीम कोर्टात उद्या शिवसेना पक्ष आणि चिन्ह प्रकरणावर तसेच आमदार अपात्रता प्रकरणावर सुनावणी होणार आहे. आता शिंदेंच्या वकिलांकडून युक्तिवाद केला जाणार आहे. याच पार्श्वभूमीवर वकिलांशी चर्चा करण्यासाठी दिल्ली दौऱ्यावर आल्याचं त्यांनी सांगितलं. तसेच त्यांनी इतरही कारण सांगितलं.



**एकनाथ शिंदे काय म्हणाले?**

मी दिल्लीला आल्यावर काही विषय पाहिजे, असं आहे का? मी दिल्लीत येत असतो. आता राज्य प्रमुखांच्या बैठका आहेत. संघटनात्मक आढावा घ्यायचा आहे. विविध राज्यांचा आढावा घ्यायचा आहे. काही ठिकाणी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आहेत. त्याबाबतही चर्चा करायची आहे. तसेच सुप्रीम कोर्टात झालेल्या सुनावणीचा आढावा, तसेच उद्यापासून शिवसेनेच्या बाजूने होणारा युक्तिवाद याबाबत चर्चा करायची आहे, अशी प्रतिक्रिया एकनाथ शिंदे यांनी दिली.

धनुष्यबाण चिन्ह गोठवण्याची मागणी करणं ही अतिशय दुर्दैवी आणि दुखद बाब आहे. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांना जे धनुष्यबाण प्राणाहून प्रिय होतं. ते धनुष्यबाण ते देवाऱ्यात ठेवायचे. ते गोठवण्याची मागणी हे अतिशय दुर्दैवी आहे. त्याचबरोबर बाळासाहेबांचे विचार तर त्यांनी २०१९ मध्ये गोठवलेच. हिंदुत्वही गोठवलं. त्याचबरोबर महाराष्ट्रातील जनतेचं बहुमतही गोठवलं. बाळासाहेबांची घटनादेखील गोठवली, असा आरोप शिंदेंनी केला.

बाळासाहेबांची घटना बदलण्याचं काम त्यांनी केलं. आता धनुष्यबाण गोठवण्याची मागणी करत आहेत. याचाच अर्थ बाळासाहेबांचे विचार, भूमिका, धोरण, हिंदुत्वाचे विचार, राष्ट्रीयत्वाचे विचार हे सगळं पुसण्याचं काम दुर्दैवाने होत आहे. पण आम्ही बाळासाहेबांचे विचार घेऊन, ज्येष्ठ दिवंगत नेते आनंद दिघे यांचे विचार घेऊन निघाले आहेत. ते लोकांनी स्वीकारलं आहे. जनतेने आशीर्वाद दिले आहेत, असं एकनाथ शिंदे म्हणाले.

कोर्टाच्या सुनावणीबाबत वकिलांसोबत चर्चा करणार आहोत. लोकशाहीत बहुमत असतं. त्यावरच निर्णय होत असतात. मी यावर जास्त भाष्य करु इच्छित नाही. कारण विषय न्यायप्रविष्ट आहे. आम्ही न्यायालयाचा सन्मान करणारे लोक आहोत. काही लोकं तर न्यायालयाला देखील मार्गदर्शन करतात. निवडणूक आयोगावर बेछूट आरोपदेखील करतात. तशी भूमिका आमची नाही. त्यामुळे मी विस्तीर्ण चर्चा करु इच्छित नाही. न्याय देवतेवर आमचा विश्वास आहे. जनतेच्या न्यायालयातदेखील आम्हाला भरभरुन आशीर्वाद मिळाला आहे, अशी प्रतिक्रिया एकनाथ शिंदे यांनी दिली.

**मनसे–भाजप वादावर प्रतिक्रिया**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नेहमीच छत्रपती शिवाजी महाराज यांना दैवतासमान आदर दिलेला आहे. मोदींनी नौदलाच्या ध्वजावरही छत्रपती शिवाजी महाराजांची राजमुद्रा प्रस्थापित केलेली आहे. यावरुन छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल जो नितांत आदर नरेंद्र मोदी यांना आहे तो आपण वेळोवेळी पाहिलेला आहे, असं एकनाथ शिंदे म्हणाले.

# ग्रामपंचायत अधिकाऱ्यांच्या सुरक्षेसाठी पालघरात मूक मोर्चा...

**अक्षराज : निलेश कासट**




**दि.०१, पालघर :** ग्राम पंचायत अधिकारी स्व.पी. एन. पाटील यांच्या दुर्दैवी मृत्यूच्या पार्श्वभूमीवर ग्रामपंचायत अधिकाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या घटनेचा निषेध आणि ग्रामपंचायत अधिकाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी ठोस उपाययोजना करण्याच्या मागणीसाठी महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत अधिकारी युनियनच्या पालघर जिल्हा शाखेच्या वतीने मंगळवार, दिनांक १ सप्टेंबर २०२६ रोजी पालघर शहरात मूक मोर्चा काढण्यात आला. जिल्हा परिषद कार्यालयापासून जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत काढण्यात आलेल्या या मोर्चात ग्रामपंचायत अधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले. मोर्चा दरम्यान सहभागी अधिकारी हातात विविध मागण्यांचे फलक घेऊन शांततेच्या मार्गाने शासनाचे लक्ष वेधत होते. ग्रामपंचायत अधिकाऱ्यांना दबाव, धमकी अथवा हल्ल्याच्या भीतीशिवाय कर्तव्य बजावता यावे, यासाठी शासनाने तातडीने ठोस निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली.

**शिवरे घटनेने अधिकाऱ्यांमध्ये संताप**

१७ ऑगस्ट २०२६ रोजी जळगाव जिल्ह्यातील पारोळा तालुक्यातील शिवरे ग्रामपंचायतीमध्ये ग्रामसभा सुरू असताना ग्रामपंचायत अधिकारी स्व. पी. एन. पाटील यांच्यावर जमावाकडून हल्ला झाल्याची घटना घडली होती. या घटनेनंतर त्यांना मानसिक व शारीरिक त्रास सहन करावा लागला आणि कर्तव्य बजावत असतानाच हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने त्यांचा मृत्यू झाल्याचे संघटनेने निवेदनात नमूद केले आहे.

या घटनेमुळे राज्यभरातील ग्रामपंचायत अधिकाऱ्यांमध्ये भीती व संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. याच पार्श्वभूमीवर ग्रामपंचायत अधिकाऱ्यांच्या सुरक्षेसाठी शासनाने प्रभावी कायदेशीर संरक्षण द्यावे, अशी मागणी आंदोलनाच्या माध्यमातून करण्यात आली.

**ग्रामसभा कामकाजावर बहिष्कार कायम**

शिवरे घटनेच्या निषेधार्थ आणि सुरक्षेच्या प्रश्नाकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी राज्य संघटनेच्या आदेशानुसार १८ ऑगस्टपासून ग्रामपंचायत अधिकाऱ्यांनी ग्रामसभा कामकाजात सचिव म्हणून काम पाहण्यावर बहिष्कार टाकला आहे. शासनाकडून ठोस निर्णय होईपर्यंत या आंदोलनाची भूमिका कायम ठेवण्यात येणार असल्याचे संघटनेच्या वतीने स्पष्ट करण्यात आले.

**६ प्रमुख मागण्यांकडे शासनाचे लक्ष**

मूक मोर्चाद्वारे संघटनेने शासनाकडे सहा प्रमुख मागण्या मांडल्या.

**शिवरे घटनेतील दोषींवर कठोर कारवाई :** स्व. पी. एन. पाटील यांच्या मृत्यूस कारणीभूत ठरलेल्या संबंधितांवर खुनाचा गुन्हा दाखल करून तातडीने अटक करावी आणि प्रकरण जलदगती न्यायालयात चालवावे.

**ग्रामसभांची संख्या मर्यादित करावी :** महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमात आवश्यक सुधारणा करून वारंवार होणाऱ्या ग्रामसभांची संख्या मर्यादित करावी. वर्षातून आर्थिक नियोजन व आढाव्यासाठी आवश्यक ग्रामसभा घेण्याची कायदेशीर तरतूद करावी.

**अनधिकृत चित्रीकरणावर निर्बंध :** ग्रामसभेतील अनधिकृत व्हिडिओ चित्रीकरण करून सोशल मीडियावर प्रसारित करण्यास प्रतिबंध घालण्यासाठी स्पष्ट मार्गदर्शक सूचना जारी कराव्यात.

**संवेदनशील ग्रामसभांना पोलीस संरक्षण :** वादग्रस्त अथवा संवेदनशील ग्रामसभांसाठी प्रशासनाकडून विनामूल्य पोलीस बंदोबस्त उपलब्ध करून द्यावा.

**इतर विभागांच्या योजनांची जबाबदारी संबंधित विभागांवर :** कृषी, आरोग्य, समाजकल्याण आदी विभागांच्या योजनांसाठी आयोजित विशेष ग्रामसभांची प्रशासकीय जबाबदारी संबंधित विभागांवर सोपवावी.

**लाभार्थी निवड प्रक्रियेत सुधारणा :** वैयक्तिक लाभाच्या योजनांसाठी लाभार्थी निवडण्याची प्रक्रिया ग्रामसभेऐवजी तालुका अथवा पंचायत समिती स्तरावर संबंधित विभागामार्फत पारदर्शक पद्धतीने राबवावी.

जिल्हाधिकाऱ्यांना निवेदनमोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर पोहोचल्यानंतर संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन सादर केले. ग्रामपंचायत अधिकारी हे ग्रामीण प्रशासनातील महत्त्वाचा दुवा असून, त्यांना सुरक्षित वातावरणात काम करण्यासाठी शासनाने तातडीने संरक्षणात्मक व कायदेशीर उपाययोजना कराव्यात, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. ग्रामपंचायत अधिकाऱ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न केवळ कर्मचाऱ्यांचा नसून ग्रामीण प्रशासनाच्या सुरळीत कामकाजाशी संबंधित आहे. शासनाने या मागण्यांची गांभीर्याने दखल घेऊन तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा यावेळी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली.

# स्मार्ट मीटरविरोधातील १० सप्टेंबरच्या आंदोलनाची जोरदार तयारी ! डहाणूत नियोजन बैठक

**अक्षराज : निलेश कासट**

**दि.०१, डहाणू (पालघर) :** महाराष्ट्रराज्य विद्युत वितरण कंपनीकडून (महावितरण) बसविण्यात येणाऱ्या स्मार्ट मीटरच्या विरोधात भारताचा कम्युनिस्ट पक्ष (मार्क्सवादी) च्या नेतृत्वाखाली दिनांक १० सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११ वाजता चारोटी येथे आंदोलन करण्यात येणार आहे. या आंदोलनाच्या नियोजनासाठी मंगळवार, दिनांक १ सप्टेंबर रोजी आशागड येथे बैठक घेण्यात आली. आंदोलन यशस्वी करण्यासाठी गावागावांत जनजागृती तसेच नागरिकांशी थेट संपर्क साधण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला.

या नियोजन बैठकीला डहाणू विधानसभा आमदार कॉ. विनोद निकोले, जिल्हा सेक्रेटरी कॉ. किरण गहला, तालुका सेक्रेटरी कॉ. रडका कलांगडा, किसान सभेचे कार्याध्यक्ष कॉ. चंद्रकांत घोरखना, जनवादी महिला संघटनेच्या कॉ. लहानी दौडा, धत्रखचे कॉ. राजेश दळवी यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**गावागावांत जनजागृतीचा निर्णय**

बैठकीमध्ये १० सप्टेंबर रोजी चारोटी येथे होणाऱ्या आंदोलनाच्या तयारीचा आढावा घेण्यात आला.




आंदोलनासाठी मोठ्या संख्येने नागरिक व कार्यकर्ते सहभागी व्हावेत, यासाठी गावागावांत बैठका घेणे, नागरिकांशी संवाद साधणे आणि स्मार्ट मीटरच्या प्रश्नाबाबत जनजागृती करण्याचे नियोजन करण्यात आले.

स्मार्ट मीटरबाबत नागरिकांमध्ये असलेल्या विविध शंका, वीज बिलांमध्ये होणारी वाढ आणि ग्राहकांवर पडणाऱ्या आर्थिक भाराचा मुद्दा आंदोलनाच्या माध्यमातून प्रशासनासमोर मांडण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

**स्मार्ट मीटर हटविण्याची मागणी**

पालघर जिल्ह्यात नागरिकांच्या इच्छेविरुद्ध बसविण्यात आलेले स्मार्ट मीटर तात्काळ काढण्यात यावेत, जुने मीटर काढून त्याऐवजी पुन्हा जुने मीटर बसविण्यात यावेत, तसेच स्मार्ट मीटरमुळे वाढलेल्या वीज बिलांबाबत ग्राहकांना दिलासा देऊन अन्यायकारक वीज बिले माफ करावीत, अशा प्रमुख मागण्या आंदोलनातून करण्यात येणार आहेत.

स्मार्ट मीटरच्या माध्यमातून सर्वसामान्य वीज ग्राहकांवर अतिरिक्त आर्थिक भार पडत असल्याचा आरोप आंदोलकांनी केला आहे. ग्राहकांच्या हिताचा विचार करून स्मार्ट मीटरबाबतचा निर्णय मागे घ्यावा, अशी भूमिका बैठकीत मांडण्यात आली.

**शेतकरी, कामगार, महिला,**
**युवकांना सहभागी होण्याचे आवाहन**

आंदोलन केवळ पक्षाचे न राहता सर्वसामान्य वीज ग्राहकांच्या प्रश्नाचे आंदोलन व्हावे, यासाठी शेतकरी, कामगार, महिला, युवक आणि सर्वसामान्य नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन बैठकीत करण्यात आले.

**स्मार्ट मीटर हटवा! जनतेला वाचवा!** या घोषणेसह १० सप्टेंबर रोजी चारोटी येथे होणारे आंदोलन व्यापक करण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला. त्यामुळे चारोटी येथे होणाऱ्या आंदोलनाकडे आता परिसरातील वीज ग्राहकांचे लक्ष लागले आहे.

# चंद्रपुरात 'भटके विमुक्त दिन' निमित्त जनजागृती कार्यक्रम संपन्न

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०१, चंद्रपूर :** इतर मागास बहुजन कल्याण विभाग, सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, चंद्रपूर यांच्यावतीने दिनांक ३१ ऑगस्ट २०२६ रोजी 'भटके विमुक्त दिना' निमित्त जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक डॉ.बाळासाहेब राठोड एस.एन.डि.टी. महिला विद्यापीठ बल्लारपूर, आनंदराव अंगलवार महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष अखिल भारतीय विमुक्त जाती, भटक्या जमाती वेलफेअर संघ. प्रविण गिलबिले, दिवाकर पुद्दटवार अशासकिय समिती सदस्य, इतर बहुजन कल्याण विभाग जिल्हा चंद्रपूर. प्रभाताई चिलके, क्रीषणाजी नागपुरे, चंद्रशेखर कोटेवार, ॲड. सोमेश्वर पडगेलवार, ॲड. मनोज पारशिवे, आनंदराव बावने, राजू लांडगे, रतन शिलावार, निताताई नवरखेळे, अलका पचारे, बालमवार ताई , आणि अमोल गुघुल प्रतिनीधी अधिकारी इतर मागास बहुजन कल्याण विभाग कार्यालय जिल्हा चंद्रपूर, आदींचे उपस्थितीत द्वीप प्रज्वलन करून, थोर पुरुषांच्या प्रतीमांचे पुजन करुन पाहुण्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत व सत्कार करून कार्यक्रमाची सुरुवात झाली.

या कार्यक्रमात भटके–विमुक्त समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक विकासाबाबत जनजागृती करण्यात आली. आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले. शेकडो लोक सदर शिबीराचे लाभ घेतले. समाजातील नागरिकांनी शासनाच्या विविध योजनांचा लाभ घ्यावा, तसेच शिक्षण व रोजगाराच्या माध्यमातून प्रगती साधावी, याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. प्रातिनिधिक स्वरूपात काही मुलें, मुलींना जात प्रमाणपत्र व इतर प्रमाणपत्र देण्यात आले. याप्रसंगी अनेक गुणवंत विद्यार्थी व सामाजिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या मान्यवरांचा स्मृतीपर समग्र वा:डमय ग्रंथ प्रदान करून सत्कार करण्यात आले

कार्यक्रमा दरम्यान चंद्रशेखर कोटेवार प्रांतिय अध्यक्ष विदर्भ बेलदार व तत्सम जमाती संघटना, आनंदराव बावने लोहार समाज संघटना, रमेश नागपूरे भोई समाज प्रमुख, आणि अलका योगेश पचारे विभागीय अध्यक्ष अखिल भारतीय भोई समाज सेवा संस्था वरोरा, कैलाश उराडे धनगर समाज पदाधिकारी, निता नवरखेले, दंडेवार यांचा मान्यवरांच्या हस्ते पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह समग्र वा:डमय ग्रंथ देऊन गौरव करण्यात आले. कार्यक्रमाला विभागाचे अधिकारी, कर्मचारी तसेच नागरिकांची उपस्थिती होती.

३१ ऑगस्ट १९५२ रोजी भटके–विमुक्त समाजाला ऐतिहासिक मुक्ती मिळाल्याच्या स्मरणार्थ हा दिवस साजरा केला जातो. महाराष्ट्रात ३१ ऑगस्ट हा 'भटके विमुक्त दिवस' म्हणून पाळला जातो. अमोल घुगुल यांनी प्रास्ताविकेतून कार्यक्रमाचे उद्देश स्पष्ट केले. प्रमुख मार्गदर्शक डॉ. बाळासाहेब राठोड, यांनी शासनाच्या विविध योजनांचा लाभ या समाजातील विद्यार्थ्यांना व समाज बंधू भगिनींना आव्हान करीत सदर समाजाचे इतिहास व देशाच्या स्वातंत्र्य लढ्यातील योगदानाबद्दल मार्गदर्शन केले. या प्रसंगी प्रविण गिलबिले, दिवाकर पुद्दटवार, यांनी शासनाच्या विविध योजनांची माहिती दिली. याप्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलतांना आनंदराव अंगलवार यांनी विमुक्त, भटक्या जमाती चे प्राचीन, मध्ययूगीन व आधुनिक काळातील जीवन व सर्वांगीण दृष्ट्या मागासलेल्या अवस्था, वर्ण व्यवस्थेचे कशा पद्धतीने हा समुदाय शिकार झाले आणि देशाच्या विविध क्षेत्रातील विमुक्त जाती भटक्या जमाती चे योगदान विशेषत: भारतातील इंग्रजी राजवटीत इंग्रजी राजसत्तेच्या विरोधातील आंदोलन, युध्दात सहभाग व युद्ध नितीत निपुण असल्याने इंग्रजांना सळो की पळो करून सोडल्याने इंग्रजांनी १८७१ सालात गुन्हेगारी कायदा लागू केला व इंग्रजांना विरोध करणाऱ्यांनासेटलमेंट वसाहतीत सहपरीवार डांबून बेकायदा पध्दतीने जीवन कंठीत करण्यास बाध्य केले. हा काळा कायदा भारत स्वतंत्र झाल्यानंतर तब्बल ५ वर्षांनी ३१ ऑगष्ट १९५२ ला तत्कालीन पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली हा गुन्हेगारी कायदा रद्द करण्यात आले. तरी आजही या समाजाकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलावा लागेल, शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक आणि राजकीय शक्ती प्रदान करून, सर्वांगीण विकासासाठी संधी उपलब्ध करून देण्यासाठी बाळकृष्ण रेणके, दादा ईदाते आयोगाच्या शिफारशी मान्य करुन या समाजाला विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी केंद्र सरकारने अनुसुचित जाती, जमाती प्रमाणे सर्वांगीण आरक्षण लागू करण्यात यावे, आणि विशेषत: या समाजाला लागू केलेले जाचक व नाहक त्रासदायक १९६० पर्यंत भटकंती करून जीवन कंठताना घरे नाही, शेती नाहीं आणि त्याकाळात या समाजातील लोकांना जन्म नोंदीही मिळत नाही म्हणून शासनानेच विमुक्त व भटक्या जमातीचे जाती व त्यांचे उपजाती म्हणून शासकीय यादी घोषित केले आणि वेळोवेळी मागासवर्गीय आयोग महाराष्ट्र राज्य स्थापन करून सर्वांगीण दृष्ट्या मागासलेले समाजालाच सदर संवर्गात समावेश करण्यात आले. तरीही जाणीवपूर्वक सदर समाजाला शासन नाहक त्रास देत आहे. तेंव्हा असे जात वैधता कायदा २०००–२०००१ आणि क्रीमी लेअर कायदा रद्द करण्यात यावे असे सरकारकडे मनोगतातून मागणी केले. या करिता समस्त विमुक्त जाती व भटक्या जमाती एकसंघ संघटन करुन सरकार दरबारी निवेदने देऊन दबाव निर्माण करणे आवश्यक आहे अशा आशयाचे मनोगत व्यक्त केले.

# मुख्यमंत्री विजय थलपती यांच्यासोबत खा.नरेश म्हस्के यांची बैठक

**अक्षराज : जे. के. पोळ**




**दि.०१, ठाणे :** वेगाने वाढणाऱ्या महानगरांसमोर निर्माण होणाऱ्या वाहतूक, पाणीपुरवठा, गृहनिर्माण आणि पायाभूत सुविधांच्या प्रश्नांवर प्रभावी उपाययोजना करण्यासाठी देशातील विविध शहरांच्या विकास मॉडेलचा अभ्यास महत्त्वाचा ठरत आहे. याच पार्श्वभूमीवर लोकसभा गृहनिर्माण व नगरविकास विषयक स्थायी समितीची महत्त्वपूर्ण बैठक चेन्नई येथे पार पडली. समितीचे सदस्य तथा ठाणे लोकसभा मतदारसंघाचे खासदार नरेश म्हस्के यांनी समितीतील अन्य खासदारांसह तामिळनाडूचे मुख्यमंत्री विजय थलपती यांची भेट घेतली.

चेन्नई हे देशातील वेगाने विकसित होणाऱ्या महानगरांपैकी एक असून, वाढती लोकसंख्या आणि त्यातून निर्माण होणाऱ्या नागरी समस्यांवर विविध पातळ्यांवर उपाययोजना करण्यात येत आहेत. या पार्श्वभूमीवर वाहतूक व्यवस्था, मेट्रोचा विस्तार, पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन, गृहनिर्माण तसेच शहराचा नियोजित विस्तार या विषयांचा समितीने सविस्तर अभ्यास केला. बैठकीदरम्यान तामिळनाडू सरकार, चेन्नई मेट्रोपॉलिटन डेव्हलपमेंट अथॉरिटी, चेन्नई मेट्रो रेल लिमिटेड, चेन्नई महानगरपालिका, चेन्नई मेट्रोपॉलिटन वॉटर सप्लाय अँड सीवरेज बोर्ड तसेच गृहनिर्माण आणि नगरविकासाशी संबंधित विविध विभागांच्या अधिकाऱ्यांनी समितीचे स्वागत केले. संबंधित विभागांच्या वतीने सुरू असलेल्या विविध महत्त्वाकांक्षी प्रकल्पांचे सादरीकरणही यावेळी करण्यात आले.




## कांद्याचा नेहमीचाच वांधा!

हिमालयाच्या मदतीला सह्याद्री धावून गेल्याचा इतिहास सर्वश्रुत आहे. तसाच महाराष्ट्राचा कांदा, त्यातही गोदेच्या खोऱ्यातला कांदा, देशाची गरज पडली की उत्तरेपासून दक्षिणेपर्यंत मदतीला धावून जातो. परवाच बहुचर्चित 'कांदा एक्स्प्रेस' दिल्लीकडे रवाना झाली. पाठोपाठ रस्तेमार्गानेही शेकडो ट्रक देशभरात पाठवले जात आहेत. मात्र, दुर्दैवाने सरकारांना आपल्या मूलभूत कर्तव्याचा आणि या मदतीच्या परतफेडीचाही विसर पडतो. गरज सरल्यावर शेती उत्पादने आणि उत्पादकांची उपेक्षा होते. विशिष्ट चवीमुळे महाराष्ट्राच्या कांद्याला बाराही महिने मागणी असते. मात्र, पुरवठ्याचे गणित बिघडले की तो दरवाढीच्या रूपाने आपला रागरंग दाखवतो. आता शासन-प्रशासनाच्या चेहऱ्यावरचे रंग उडायला सुरुवात झाली आहे.

सणासुदीच्या काळात दूध, साखर आणि कांदा तेजीवर स्वार झाल्याने महागाईच्या आगडोंबात सामान्य ग्राहक भरडला जात असल्याची ओरड होते आहे. एरवी उत्पादक होरपळत असतो, त्याच्या वेदनांकडे लक्ष द्यायलाही कोणाला फुरसत नसते. किरकोळ बाजारात वरील तिन्ही वस्तूंचे दर कमी-अधिक फरकाने 'साठी'च्या पातळीवर पोहोचले आहेत. तरीही पिकवणारा आणि खाणारा दोघेही तोट्यात, असे भलतेच त्रांगडे निर्माण झाले आहे. मधली साखळी मात्र तुपाशी आहे. ही परिस्थिती जाणूनबुजून निर्माण केली जाते, या आरोपातही तथ्य आहे. तूर्तास कांदा एक्स्प्रेसमधील सडलेला कांदा चर्चेच्या केंद्रस्थानी आहे. ही रेल्वे रवाना होण्यापूर्वीच सरकारी गोदामात मोठ्या प्रमाणावर कांदा सडला होता. त्याची खरेदी नाफेड आणि 'एनसीसीएफ'मार्फत झाली होती. रेल्वे धक्क्याला लागल्यानंतर सुस्तावलेल्या व्यवस्थेला ऐनवेळी 'लोडिंग'ची आठवण झाली. मजूर आणि ट्रक शोधताना धावाधाव झाली, उशीर झाला. खोळंब्यामुळे वेळ आणि सरकारी पैसा वाया गेला. काही तासांच्या प्रवासानंतर राजधानीत पोहोचेपर्यंत आणखी कांदा नासला. आता ग्राहकाला तो वाजवी दरात मिळत असला, तरी शेवटी उत्पादकाच्या नावाने कंठशोष सुरू आहे. प्रत्यक्षात हा कांदा काही दिवसांपूर्वी मंडईतून, तेही व्यापाऱ्यांकडूनच खरेदी करण्यात आला होता. वखार महामंडळाच्या गोदामांत शास्त्रीय साठवणुकीची व्यवस्था नसल्याने तो सडला. मग उत्पादकाला दोष कसा देता येईल? त्याच्यापुढची आव्हाने आधीच कमी आहेत का?

यंदा अवकाळी पावसाने रोपे खराब झाली. पुढे मान्सूनला उशीर झाल्याने लागवड लांबली. जिथे लागवड झाली, तिथे अतिपावसाने शेतातील उभे पीक आणि शेतकऱ्यांची स्वप्ने खरवडून काढली. दुसरीकडे कांद्याचे थोडेबहुत उत्पादन घेणारे आठ-दहा जिल्हे अद्याप आभाळाकडे नजरा लावून आहेत. या संकटातूनही तरलेल्या कांद्याला जरा बरा दर मिळतो आहे. मात्र, शासनाला जणू तेही सहन होत नसावे. दीर्घकालीन उपाय करण्याऐवजी निर्यातबंदी, आयातीची तयारी, साठेबाजीवर मर्यादा, छापेमारी असे तकलादू सोपस्कार सुरू आहेत. 'जखम मांडीला आणि मलम शेंडीला' असाच सारा मामला. काही महिन्यांपूर्वी दर घसरले तेव्हा नाफेड आणि एनसीसीएफने दोन लाख टन कांदा खरेदीच्या घोषणा केल्या. प्रत्यक्षात जेमतेम सव्वा लाख टन उत्पादनच बाजारातून उचलले गेले. त्यातही भ्रष्टाचाराच्या कथा बाहेर आल्या. शेतकऱ्यांच्या नावाने पावत्या फाडल्या गेल्या; पण लाभ कोणाला झाला, हा प्रश्न अनुत्तरितच आहे. आता आडातच नाही, तर पोहऱ्यात कुठून येणार?

नव्या कांद्याची लागवड सुरू असल्याने पुढील तीन महिने ग्राहकांना कळ सोसावीच लागेल. कृषिप्रधान महाराष्ट्रात पिकाला हमीभाव नाही. निर्जलीकरणाची पुरेशी व्यवस्था नाही. मोठ्या प्रमाणावर उत्पादन होऊनही पाच टक्के साठाही शास्त्रीय पद्धतीने राखता येत नाही. चाळी आणि गोदामांसाठी प्रोत्साहन, अनुदाने, प्रक्रिया उद्योग, निर्जलीकरण प्रकल्प आणि शेतकरी-ग्राहक थेट बाजार व्यवस्था उभी राहिली, तरच मार्ग निघू शकेल; अन्यथा हे चक्र असेच फिरत राहील. शेती आणि शेतकरी टिकला, तरच देश टिकेल, हे वारंवार सांगावे लागणे हीच खरी शोकांतिका.

**– संपत थेटे**

# 'हेअरकट' चे अर्थकारण...

झी ऊद्योग समुहाचे सुभाष चंद्रा यांच्या कडे येणे असलेले बावीस हजार कोटी रुपयांवर पाणी सोडतांना एनसीटीएल लवादाने मोठी ऊदारता दाखवत केवळ सहा कोटी रुपये भरण्यावर तडजोड केली जवळपास नव्व्याण्णव टक्के कर्जमाफी ची सुभाष चंद्रा यांच्यावर मेहरबानी करण्यात आली आहे. या अगोदर देखील बँका, एनसीएलटी, सारख्या यंत्रणांनी अशीच तडजोड करून व्हडीओकॉन ऊद्योग समुहाची ६४,६३८ कोटी रुपयांची मुळ थकबाकी असतांना केवळ २,९६२ कोटी रुपयांची तडजोड करत तब्बल ९५ टक्के कर्जमाफी दिली गेली.

याच बरोबर शिवाणी ऑईल अँण्ड गॅस कडुन येणे असलेली रक्कम ८,९०८ कोटी असतांना केवळ २८३ कोटी रुपये वसुल करुन तडजोड करण्यात आली. योगाचा प्रसार करणारे बाबा रामदेव यांनी रुची सोया कंपनी खरेदी केली त्याकंपनीकडे येणे असलेली रक्कम होती १२,१०० कोटी रुपये आणि तडजोड करण्यात आली ती ४,३५० कोटी रुपयांवर त्याच बरोबर भुषण स्टील कंपनी कडे ५६ हजार कोटी रुपयांची थकबाकी असतांना ३५,२०० कोटी रुपयांवर तडजोड करण्यात आली आणि बाकीच्या रकमेवर बँकांना पाणी सोडावे लागले. याशिवाय ईतर अनेक थकबाकीदारांबाबत बँका ताळेबंद स्वच्छतेच्या नावाखाली नाममात्र रकमेवर तडजोड करतच असतात. बँकाचे ताळेबंद स्वच्छ दिसावे, अनुतदित कर्ज, बुडित कर्ज कमी दिसावे यासाठी हे कर्ज असेट रिकव्हरी कंपनी कडे वळते केले जाते आणि ही कंपनी असा घाट्याचा सौदा करते. या कंपनीत निधी ऊभारला जातो तो पैसा अर्थातच तुमचा आमचाच असतो. न चालणाऱ्या कंपन्यांना बीआयएफआर कडुन आजारी ठरवले जाते मग अशा कंपन्यांच्या पुनर्जीवन वा पुढील कारवाई साठी पात्र ठरविल्याजातात. अशा कंपन्यां या बहुतांश विलफुल डिफॉल्टर, बाजारातील बाह्य परिस्थिती, यामुळे आजारी ऊद्योग म्हणून घोषित होतात मग कर्जमाफी तडजोड याबाबतची पुढील प्रक्रिया पार पडते आणि मग असा घाट्याचा सौदा केला जातो. या सगळ्यात जनतेच्या पैशाचा अपव्यय होतो हे याची मात्र कोणाला ना खंत ना खेद. विशेष म्हणजे अल्प किमत लावुन बडे ऊद्योगपतीच कधी नावे बदलुन कधी व्यवसाय बदलुन अशा कंपन्या खरेदी करतात, या सगळ्यात मोठे अर्थ कारण दडलेले आहे.

राजकीय पक्ष विशेषतः सत्ताधारी पक्षाला अशा कंपन्या, ऊद्योगपती करोडो रुपयांची देणगी का देतात हे ये पब्लिक है ये सब जानती है. अदानी अंबानींसाठी तर सगळ्या यंत्रणा कशा



झटतात हे देश पहात आहे. अदाणींना एखाद्या ऊद्योगावर कब्जा करायचा असेल तर ईडी, सिबीआय, आयटी सारख्या तपासणी यंत्रणा कामाला लागतात त्या ऊद्योगाची, ऊद्योजकाची कोंडी केली जाते आणि कालांतराने तो ऊद्योग अलगदपणे अदाणी च्या ताब्यात येतो. एनडीटीव्ही, एसीसी सिमेंट, मुंबईतील विमानतळाची देखभाल ही काही ऊदाहरण आहेत.

ऐकिकडे देशावर जवळपास दोनशे लाख कोटी रुपयांच्यावर कर्ज आहे, बँकांची आर्थिक स्थिती देखील चांगली नाही. २०१६ मधे निरव मोदी, मेहुल चौक्सी, विजय मल्ल्या यांनी भारतीय बँकांना चुना लावला आणि परदेशी पळुन गेले आजपर्यंत त्यांच्या पैकी कुणालाही भारतात परत आणले गेले नाही.

सत्तेवर आले तेव्हा मोदी यांनी परदेशातील काळा पैसा भारतात परत आणणार असे आश्वासन दिले होते त्यातील एक रुपया देखील परत तर आला नाही याऊलट त्यांच्याच काळात भारतीयांच्या स्विस बँकेतील पैशात वाढ झाली आहे. एनसीटीएल सारख्या यंत्रणा बँका, देशाचे हित यापेक्षा कर्जबुडव्यांचे हित जपत आहेत का असा प्रश्न पडतो. या अगोदर देखील गेल्या दहा बारा वर्षांत कर्जबुडव्या ऊद्योगपतींचे जवळपास पंधरा लाख कोटी रुपयांचे कर्ज माफ केले गेले आहे. बँका देखील धनदांडगे, कर्जबुडव्यांसाठी रेड कार्पेट अंथरते आणि ज्या सामान्य जनतेचा पैसा बँकामधे जमा होतो आणि बँका व्यवसाय करतात त्यांना मात्र बँकाकडुन कशी वागणुक मिळते हे ये पब्लिक है ये सब जानती है. पाच पन्नास हजार रुपयांचे कर्ज काढायचे म्हटले तरी सामान्य ग्राहकांना काय काय दिव्य पार पाडावे लागते आणि बँका कश्यापद्धतीने वेळकाढूपणा करतात हे सामान्य जनता अनुभवते आहे. एक जरी हप्ता चुकला तरी बँका ग्राहकांचा पिच्छा सोडत नाहीत. याशिवाय वेगवेगळ्या चार्जेस च्या नावाखाली बँका जनतेची लुट करत आहेत आणि कर्जबुडव्यांवर ऊधळपट्टी करत आहे. शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा विषय, सामान्य जनतेला दिलासा देण्याचा विषय आला कि सरकारला तिजोरी आठवते मात्र बडी धेंडे असलेल्या कर्जबुडव्यांवर मेहरबान होतांना मात्र सढळहस्ते खैरात केली जाते.

**– अनंत बोरसे**
**शहापूर जिल्हा ठाणे**
**९१५८४९५०३७**

# निसर्ग निसर्गच राहू द्या ! मानवाच्या विकासाच्या गर्वाला निसर्गाने दिलेला हा धोक्याचा इशारा आहे

नेपाळ-चीन सीमेवर घडलेल्या भीषण महापुराने संपूर्ण जगाला हादरवून सोडले आहे. सुरुवातीला या दुर्घटनेमागे भूकंप असल्याचे मानले जात होते; मात्र अमेरिकेच्या भूगर्भ सर्वेक्षण संस्थेनेणडत्रह्डने अधिक सखोल भूकंपीय लहरी, उपग्रह चित्रे आणि इतर माहितीचे विश्लेषण केल्यानंतर स्पष्ट केले की, हा भूकंप नव्हता. लांगटांग लिरुंग परिसरातील हिमनदीचा मोठा भाग कोसळला, त्यातून बर्फ, खडक, माती आणि पाण्याचा प्रचंड मलबा प्रवाह निर्माण झाला आणि त्याने पुढे महापुराचे रौद्ररूप धारण केले. या घटनेत निर्माण झालेली ऊर्जा तब्बल ५.२ तीव्रतेच्या भूकंपाएवढी होती.

कॅनडातील युनिव्हर्सिटी ऑफ कॅलगरीचे



भूआकृतीशास्त्राचे सहयोगी प्राध्यापक डॅनियल शुगर यांच्या प्राथमिक उपग्रह विश्लेषणानुसार, सुमारे ५,२०० मीटर उंचीवरून हिमनदीचा मोठा भाग खाली कोसळला आणि तब्बल १,२०० मीटरची उभी घसरण झाली. त्या प्रचंड वेगाने खाली आलेल्या बर्फ-खडकांच्या राशीने नदीच्या प्रवाहात मलबा मिसळला आणि काही क्षणांतच तो विध्वंसक जलप्रलयात परिवर्तित झाला.

USGS च्या माहितीनुसार हा मलबा प्रवाह आणि पूर जवळपास १०० किलोमीटरपर्यंत पसरला. डोंगरांच्या कुशीतून सुरू झालेला हा प्रलय गावांवर, रस्त्यांवर, पुलांवर आणि मानवी वसाहतींवर अक्षरशः तुटून पडला.

या दुर्घटनेची मानवी किंमत किती मोठी आहे, याची कल्पनाच करवत नाही. शेकडो नागरिकांचा मृत्यू झाला असून हजारो जण बेपत्ता असल्याचे विविध अहवालांतून समोर येत आहे. रस्ते, पूल, वीज प्रकल्प, घरे आणि संपूर्ण वसाहती माती-बर्फ-दगडांच्या ढिगाऱ्याखाली गाडल्या गेल्या. बचावकार्य सुरू असतानाच काही ठिकाणी निर्माण झालेल्या नव्या जलसाठ्यांमुळे आणखी पुराचा धोका कायम आहे.

हा केवळ एक नैसर्गिक प्रकोप नाही; हा मानवाने स्वतःला विचारायचा एक कठोर प्रश्न आहे.

आपण विकासाच्या नावाखाली पर्वत पोखरत आहोत. जंगलांचे क्षेत्र कमी करत आहोत. नद्यांचे नैसर्गिक प्रवाह बदलत आहोत. डोंगर कापून रस्ते रुंद करत आहोत. बोगदे, पूल, धरणे, जलविद्युत प्रकल्प आणि पर्यटनाच्या सुविधा उभारताना त्या परिसराची नैसर्गिक क्षमता किती आहे, याचा विचार अनेकदा दुय्यम ठरतो.

पण निसर्गाची सहनशीलता अमर्याद नसते.
निसर्ग शांत असतो; पण तो कमजोर नसतो.
तो सहन करतो; पण विसरत नाही.
आणि जेव्हा तो उत्तर देतो, तेव्हा मानवाची सारी ताकद क्षणार्धात अपुरी पडते.

हिमालय हा केवळ पर्वतरांगांचा समूह नाही. तो भारतीय उपखंडाच्या असंख्य नद्यांचा उगम आहे, कोट्यवधी लोकांच्या जीवनाचा आधार आहे आणि आशियाच्या पर्यावरणीय संतुलनाचा महत्त्वाचा आधारस्तंभ आहे. त्यामुळे हिमालयातील प्रत्येक बदल हा केवळ नेपाळ, तिबेट किंवा भारतापुरता मर्यादित राहत नाही; त्याचे परिणाम दूरवरच्या समाजजीवनावर होऊ शकतात.

हवामान बदलामुळे हिमालयीन प्रदेशात तापमानवाढ, हिमनद्यांचे वितळणे, बर्फाच्या संरचनेतील बदल, पर्माफ्रॉस्ट वितळणे आणि पर्वतीय उतारांची अस्थिरता याबाबत वैज्ञानिक सातत्याने इशारे देत आहेत. मात्र, एखाद्या विशिष्ट दुर्घटनेचे एकमेव कारण हवामान बदल आहे, असे घाईने ठरवणे योग्य नाही. परंतु वाढते तापमान अशा हिमनदीजन्य धोक्यांची शक्यता वाढवू शकते, याकडे दुर्लक्षही करता येणार नाही.

भारतानेही या घटनेकडे केवळ शेजारच्या देशातील दुर्घटना म्हणून पाहू नये.
केदारनाथची वेदना आपण विसरलेलो नाही.
चमोलीचा धडा अजूनही ताजा आहे.
हिमालयातील बदलती परिस्थिती आपल्यालाही सावध करत आहे.

प्रश्न विकासाचा विरोध करण्याचा नाही. प्रश्न आहे तो विकासाच्या दिशेचा आणि पद्धतीचा.
रस्ते हवेत, पण पर्वत उद्ध्वस्त करून नव्हे.
जलविद्युत प्रकल्प हवेत, पण नदीचे पर्यावरण नष्ट करून नव्हे.
पर्यटन हवे, पण डोंगरांची वहनक्षमता संपवून नव्हे.
शहरे आणि वसाहती हव्यात, पण नदीच्या नैसर्गिक पात्रावर अतिक्रमण करून नव्हे.
आज गरज आहे ती 'विकास विरुद्ध पर्यावरण' अशी निवड करण्याची नाही; तर 'पर्यावरणपूरक आणि शाश्वत विकास' स्वीकारण्याची.

हिमालयीन प्रदेशात अत्याधुनिक उपग्रह निरीक्षण, हिमनद्यांचे सातत्यपूर्ण मॉनिटरिंग, भूस्खलन आणि हिमस्खलनाचा धोका मोजणारी यंत्रणा, नदीपात्रांचे वैज्ञानिक मॅपिंग, स्थानिक पातळीवरील पूर्वसूचना प्रणाली आणि आपत्कालीन स्थलांतराचे नियोजन यांना सर्वोच्च प्राधान्य दिले पाहिजे. केवळ दुर्घटना घडल्यानंतर मदत करण्यापेक्षा दुर्घटना घडण्यापूर्वी जीव वाचवण्याची यंत्रणा उभी करणे, ही खरी दूरदृष्टी ठरेल. कारण संकट आल्यानंतर हेलिकॉप्टर पोहोचवता येते; मदत पाठवता येते; रस्ते पुन्हा बांधता येतात. पण गेलेले जीव आणि उद्धवस्त झालेले गाव पुन्हा उभे करता येत नाहीत.

या दुर्घटनेने आपल्याला एक अत्यंत साधा, पण अस्वस्थ करणारा प्रश्न विचारला आहे
आपण निसर्गाला जिंकत आहोत की स्वतःच्या विनाशाचा मार्ग तयार करत आहोत?

मानवाने विज्ञान जिंकले, तंत्रज्ञान विकसित केले, पर्वत भेदले, नद्या वळवल्या आणि आकाशाला गवसणी घातली. या प्रगतीचा अभिमान असायलाच हवा. पण त्या अभिमानाला विवेकाची जोड नसेल, तर प्रगतीच विनाशाचे कारण ठरू शकते.

निसर्गावर मात करण्याचा प्रयत्न करण्याऐवजी निसर्गासोबत जगण्याची कला मानवाने शिकली पाहिजे.
पर्वत आपले नाहीत आपण पर्वतांचे आहोत.
नद्या आपल्या मालकीच्या नाहीत त्या पुढच्या पिढ्यांची संपत्ती आहेत.
जंगल आपली जमीन नाही ते आपल्या अस्तित्वाचा श्वास आहे.
म्हणूनच आता विकासाच्या प्रत्येक निर्णयापूर्वी एक प्रश्न विचारला पाहिजे
'यातून मानवाला किती फायदा होईल?'
यापेक्षा
'यामुळे निसर्गावर किती परिणाम होईल?'
हा प्रश्न विचारण्याची वेळ आली आहे.

नेपाळमधील हा महाप्रलय कदाचित काही दिवसांनी वर्तमानपत्रांच्या मथळ्यांतून नाहीसा होईल. मदतकार्य पूर्ण होईल, रस्ते पुन्हा बांधले जातील, पूल उभे राहतील आणि जीवन हळूहळू पूर्वपदावर येईल. पण या दुर्घटनेतून मिळालेला धडा जर आपण विसरलो, तर इतिहास आपल्याला पुन्हा पुन्हा त्याच किंमतीत शिकवेल.

निसर्गाशी संघर्ष करून मानवजातीचा विजय होऊ शकत नाही.
निसर्गाशी समतोल साधूनच मानवजातीचे भविष्य सुरक्षित होऊ शकते.
म्हणूनच आज गरज आहे ती निसर्गाला जिंकण्याची नाही
निसर्गाला समजून घेण्याची,
निसर्गाचा आदर करण्याची
आणि निसर्गाच्या मर्यादेत राहून विकास करण्याची.
कारण
निसर्ग निसर्गच राहू द्या
त्याला आपल्या सोयीसाठी बदलण्याचा अट्टाहास करू नका.
निसर्गाने दिलेले उत्तर मानवजातीला परवडणारे नाही!

**पत्रकार विकास दळवी**
**दै.अक्षराज, ठाणे प्रतिनिधी**

## पुढे पुढे

अ खंडित धावा धाव
पळतचं राहतोयं पुढे
जे असे आपल्या पुढे
त्यांस पाठीमागे ओढे

साम दाम न् दंड भेद
नाही कसले आढेवेढे
अडचणीत आणेदुजा
संकटात संपूर्णतः वेढे

पाठीशी उभेआपल्या
त्यांना पाठीमागे सोडे
उपकार अनंत केलेले
लक्षात न ठेवावे थोडे

काम करु घेण्यासाठी
हातहजार वेळा जोडे
निदर्शने त्यांचे विरोधां
भिरकावी सभेत जोडे

कुटील कारस्थाने करे
कुणाशीही दोस्ती जुडे
जुनी नाती दे मुठमाती
कुणांवरतीही स्नेहजडे

स्वार्थापोटी काहीसुद्धा
गाढ्यां विश्वासाला तडे
किंमत कुठे आश्वासनां
दिलेल्या शब्दांला तोडे

सतत भिती हरण्याची
शर्यतीत छाती धडधडे
शिवत असता भोज्यां
कसे ऐनवेळेस धडपडे


**– हेमंत मुसरीफ, पुणे**
**९७३०३०६९९६**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# टॅक्सी व रिक्षांच्या भाडेदरात वाढ; सुधारित दर १ सप्टेंबरपासून लागू

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०१, ठाणे :** मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरण समितीच्या बैठकीत मुंबई महानगर क्षेत्रातील सीएनजी चालित काळी-पिवळी मीटर टॅक्सी आणि ऑटोरिक्षांच्या भाडेदरात सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मोटार वाहन कायदा, १९८८ च्या कलम ६८ अन्वये गठित या प्राधिकरणाची बैठक २० ऑगस्ट २०२६ रोजी अपर मुख्य सचिव (परिवहन) यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. वाहनांच्या सरासरी किंमतीत, ग्राहक निर्देशांकात आणि वाहन कर्जाच्या व्याजदरात झालेली वाढ लक्षात घेता, शासन निर्णय दिनांक ०९ मार्च २०२० द्वारे स्वीकृत




खटुआ समितीच्या सूत्रानुसार ही भाडेवाढ करण्यात आली आहे.

**सुधारित भाडेदरांचा तपशील**

काळी-पिवळी मीटर टॅक्सी (सीएनजी) : किमान देय भाडे (पहिले १.५ किलोमीटरसाठी) रुपये ३१/- वरून वाढवून रुपये ३३/- करण्यात आले आहे. पुढील प्रतिकिलोमीटर भाडे रुपये २०.६६ वरून वाढवून रुपये २१.९० करण्यात आले आहे.ऑटोरिक्षा (सीएनजी) : किमान देय भाडे (पहिले १.५ किलोमीटरसाठी) रुपये २६/- वरून वाढवून रुपये २७/- करण्यात आले आहे. पुढील प्रतिकिलोमीटर भाडे रुपये १७.१४/- वरून वाढवून रुपये १८.२२/- करण्यात आले आहे.

**अंमलबजावणी व अटी**

ही भाडेदर सुधारणा मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरण क्षेत्रांतर्गत येणाऱ्या सर्व सीएनजी काळी-पिवळी मीटर टॅक्सी व ऑटोरिक्षांना लागू राहील. उपरोक्त भाडेदर सुधारणा दिनांक ०१/०९/२०२६ पासून अमलात येईल. सुधारीत भाडेदरानुसार भाडेमिटरचे (चशींशऑ) रिकॅलीब्रेशन करून घेणे बंधनकारक असून, जे परवानाधारक रिकॅलीब्रेशन करून घेतील, केवळ त्याच ऑटोरिक्षा व टॅक्सींना ही भाडेवाढ लागू होईल.

भाडेमिटरचे रिकॅलीब्रेशन दिनांक ०१/०९/२०२६ ते दिनांक ३०/११/२०२६ या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक आहे, अशी माहिती उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे रोहित काटकर यांनी दिली आहे.

# कळंबोलीच्या शासकीय वसतिगृहातील विद्यार्थिनींच्या तक्रारींची दखल; ASA मैदानात

## गृहपालांकडून लेखी आश्वासन; समस्यांवर तातडीने कार्यवाहीचे आश्वासन

**अक्षराज : अभिनव येलवे**

**दि.३१, पनवेल (नवी मुंबई) :** कळंबोली येथील सावित्रीबाई फ ुले मुलींच्या शासकीय वसतिगृहातील विद्यार्थिनींच्या विविध तक्रारी अखेर संघटनेच्या माध्यमातून प्रशासनासमोर पोहोचल्या आहेत. विद्यार्थिनींच्या समस्या जाणून घेण्यासाठी आंबेडकर स्टुडंट्स असोसिएशन (ASA), महाराष्ट्र राज्याच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी वसतिगृहाला भेट देत विद्यार्थिनींशी थेट संवाद साधला.

यावेळी विद्यार्थिनींनी वसतिगृहातील विविध अडचणी आणि समस्यांची माहिती ASA च्या पदाधिकाऱ्यांना दिली. मूलभूत सुविधा, सुरक्षितता आणि शैक्षणिक वातावरणाशी संबंधित प्रश्नांवर विद्यार्थिनींनी आपली भूमिका मांडली. विद्यार्थिनींच्या तक्रारी ऐकून घेतल्यानंतर ASA च्या पदाधिकाऱ्यांनी संबंधित गृहपालांशी चर्चा करून या समस्या तातडीने सोडविण्याची मागणी केली. या चर्चेनंतर विद्यार्थिनींच्या समस्यांवर लवकरात लवकर कार्यवाही करून त्या सोडविण्याचे लेखी आश्वासन गृहपालांकडून घेण्यात आले. त्यामुळे विद्यार्थिनींच्या तक्रारींवर प्रशासनाकडून आता कोणती पावले उचलली जातात, याकडे लक्ष लागले आहे.

वसतिगृहातील विद्यार्थिनींना सुरक्षित आणि चांगल्या शैक्षणिक वातावरणासह आवश्यक मूलभूत



सुविधा मिळणे गरजेचे आहे. प्रशासनाने विद्यार्थिनींच्या प्रश्नांकडे गांभीर्याने पाहून केवळ आश्वासन न देता प्रत्यक्षात तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी ASA कडून करण्यात आली. तसेच, विद्यार्थिनींच्या समस्यांवर करण्यात येणाऱ्या कार्यवाहीचा पुढील काळात पाठपुरावा करण्यात येणार असल्याचे संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

विद्यार्थ्यांच्या हक्कांसाठी आणि न्यायासाठी ASA सदैव मैदानात राहील, असा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आली.

# वाकी नगरी सजणार ताजुद्दीन बाबांच्या उर्ससाठी; ३ सप्टेंबर ला संदल मिरवणूक

## झेंडावंदन, चादर अर्पण; महाप्रसाद, मिलाद-कव्वालीचा रंगणार भक्तिमय सोहळा

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०१, नागपूर :** श्री क्षेत्र वाकी येथे श्री बाबा ताजुद्दीन औलिया यांच्या सहाम ाही उर्सनिमित्त ३ सप्टेंबर रोजी विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या पवित्र सोहळ्यासाठी दरवर्षीप्रमाणे यंदाही परिसरातील तसेच दूरवरून मोठ्या संख्येने भाविक वाकी येथे दाखल होणार आहेत.

राष्ट्रीय एकता व अखंडतेचा संदेश देणारे श्री बाबा ताजुद्दीन औलिया यांनी आपल्या जीवनातील १२ वर्षांचा कालावधी वाकी येथे व्यतीत केला. त्यांच्या चरणस्पर्शाने पावन झालेल्या



या भूमीत होणाऱ्या उर्सला भाविकांच्या श्रद्धेत विशेष स्थान आहे.उर्सनिमित्त गुरुवार, दिनांक ०३ सप्टेंबर रोजी दुपारी २ वाजता प.पू.काशिनाथ नाना डहाके पाटील यांच्या वाकी येथील निवासस्थानातून (वाडा) भव्य संदल मि रवणुकीला सुरुवात होईल. वाकी गावातून मार्गक्रमण करीत संदल सायंकाळी ६ वाजता वाकी दरबारात पोहोचेल. त्यानंतर परंपरेनुसार सज्जादा नशीन श्री ज्ञानेश्वरराव डाहाके पाटील यांच्या हस्ते झेंडावंदन करण्यात येईल. बाबांच्या म जारवर चादर अर्पण केल्यानंतर उर्सला विधिवत सुरुवात होईल.

उर्सनिमित्त भाविकांसाठी म हाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून, रात्री ८ वाजता मिलाद व कव्वालीचा विशेष कार्यक्रम होणार आहे. ४ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता कुल शरीफचा कार्यक्रम पार पडणार असून, त्यानंतर सहामाही उर्सची सांगता होईल.

या भक्तिमय सोहळ्याचा लाभ घेण्यासाठी भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून श्री बाबा ताजुद्दीन औलिया यांचे दर्शन व आशीर्वाद घ्यावेत, असे आवाहन श्री बाबा ताजुद्दीन दर्गा वाकी ट्रस्टचे अध्यक्ष तथा सज्जादा नशीनप्रभाकरडाहाके पाटील यांनी केले आहे.

# पथविक्रेत्यांवर होणारा अन्याय खपवून घेणार नाही, अन्यथा आळंदी नगरपरिषदेवर उग्र आंदोलन छेडणार

## भगवानराव वैराट यांचा इशारा; मुख्याधिकाऱ्यांकडून ८ दिवसांत निर्णयाचे आश्वासन

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०१, आळंदी (पुणे) :** आळंदी शहरातील पात्र पथविक्रेते व भाजी मंडईतील गाळाधारकांवर नगरपरिषद प्रशासनाकडून होत असलेला अन्याय कोणत्याही परिस्थितीत सहन केला जाणार नाही. भाजी मंडईला रस्त्याच्या बाजूने लोखंडी पत्रे (अडथळे) लावून गरीबांच्या पोटावर पाय मारण्याचा निर्णय प्रशासनाने तत्काळ मागे घ्यावा, अन्यथा नगरपरिषदेवर तीव्र व उग्र स्वरूपाचे आंदोलन छेडण्यात येईल, असा थेट इशारा महाराष्ट्र राज्य पथारी सुरक्षा दलाचे संस्थापक अध्यक्ष संघर्ष नायक लोकनेते भगवानराव वैराट यांनी दिला आहे. मंगळवार, ०१ सप्टेंबर २०२६ रोजी आळंदी नगरपरिषदेत पथविक्रेत्यांच्या प्रलंबित प्रश्नांवर मुख्याधिकारी महादेव खांडेकर यांच्यासोबत एक महत्त्वपूर्ण व वादळी बैठक पार पडली.

**संघर्ष नायक लोकनेते भगवानराव वैराट यांची भूमिका :**

अन्याय सहन करणार नाही: गोरगरीब भाजी विक्रेते व कष्टकऱ्यांचा रोजगार हिरावून घेण्याचे काम पालिका करत असून हा अन्याय तीव्र संघर्षाने मोडून काढला जाईल. अन्यायकारक निर्णय रद्द करा: भाजी मंडईभोवती लोखंडी पत्रे ठोकण्याचा मनमानी निर्णय पालिका प्रशासनाने तात्काळ मागे घ्यावा. कायदेशीर हक्क मिळालेच पाहिजेत: शहरात वर्षानुवर्षे व्यवसाय करणाऱ्या पात्र पथविक्रेत्यांना कायद्यानुसार हक्क व संरक्षण मिळालेच पाहिजे.




**पुणे जिल्हा अध्यक्ष संतोष सोनवणे यांची तांत्रिक व कायदेशीर बाजू :**

कायद्याची पायमल्ली: पथविक्रेता कायदा २०१४, केंद्र व राज्य शासनाचे धोरण आणि सर्वोच्च न्यायालयाच्या ऐतिहासिक निर्णयानुसार व्हेंडिंग झोनमध्ये अडथळे निर्माण करणे पूर्णपणे बेकायदेशीर आहे.

TVC अधिकार : नगरपरिषदेने शहर पथविक्रेता समि तीला (TVC) अंधारात ठेवून घेतलेला निर्णय कायदेशीर चौकटीत टिकणारा नाही. सर्व निर्णय कायद्यानुसारच घेतले जावेत.

**शिष्टमंडळाच्या मुख्य मागण्या :**

१. पत्रे तत्काळ हटवा: भाजी मंडईच्या बाजूने लावले जाणारे लोखंडी पत्रे (अडथळे) तात्काळ रद्द करावेत.

२. १५ दिवसांत व्हेंडिंग सर्टिफिकेट वितरण: आळंदीतील सर्व पात्र पथविक्रेत्यांना व भाजी मंडई गाळाधारकांना पुढील १५ दिवसांत 'पथविक्री प्रमाणपत्र' (व्हेंडिंग सर्टिफिकेट) देण्यात यावे.

३. विशेष बैठक व इतिवृत्त: शहर पथविक्रेता समि तीची (TVC) तातडीने विशेष बैठक घेऊन १ सप्टेंबर रोजी झालेल्या बैठकीचे अधिकृत लेखी पत्र देण्यात यावे.

४. इंद्रायणी घाटावरील विक्रेत्यांचे संरक्षण: इंद्रायणी घाटावरील पात्र पथविक्रेत्यांना आहे त्याच जागी व्यवसाय करण्याची परवानगी द्यावी.

५. TVC सदस्यांना सुविधा : पथविक्रेता समिती सदस्यांना अधिकृत ओळखपत्रे द्यावीत, पालिकेत समि तीचा फलक लावावा आणि सदस्यांसाठी स्वतंत्र केबिन देण्यात यावी.

**नगरपरिषद प्रशासनाचे आश्वासन :**

संघटनेच्या आक्रमक भूमिकेनंतर आणि कायदेशीर बाबींच्या मांडणीनंतर आळंदी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी श्री. महादेव खांडेकर साहेब यांनी सकारात्मक भूमिका घेतली. येत्या ८ दिवसांत आळंदी शहर पथविक्रेता समितीची (TVC) विशेष बैठक घेऊन सर्व मागण्यांवर योग्य व कायदेशीर निर्णय घेतला जाईल, असे आश्वासन मुख्याधिकाऱ्यांनी दिले.

**भविष्यातील आक्रमक आंदोलनाची भूमिका :**

दिलेल्या ८ दिवसांच्या मुदतीत प्रशासनाने सकारात्म क निर्णय न घेतल्यास किंवा पत्रे हटवण्याचा निर्णय म ागे न घेतल्यास, महाराष्ट्र राज्य पथारी सुरक्षा दलाच्या वतीने आळंदी नगरपरिषदेच्या अधिकाऱ्यांना घेराव घालून सनदशीर मार्गाने 'बोंब मारो आंदोलन' व उग्र लोकआंदोलन छेडण्यात येईल, असा सडेतोड इशारा शिष्टमंडळाने दिला आहे.

# थोडक्यात बातम्या

## दहीहंडी, गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पोलीस व महानगरपालिका प्रशासनाची बैठक

**अक्षराज : घनश्याम आंबोकर**




**दि.०१, मिरा-भाईंदर :** दिनांक ०२ जुलै २०२६ रोजी मिरा-भाईंदर महानगरपालिका आणि मिरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालय यांच्या संयुक्त विद्यमाने आगामी दहीहंडी व गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर विशेष बैठक आयोजित करण्यात आली.

या बैठकीमध्ये दहीहंडी व गणेशोत्सव मंडळांना उत्सवाच्या आयोजनासंदर्भातील नियम, परवानग्या, सुरक्षा व्यवस्था तसेच प्रशासनाच्या मार्गदर्शक सूचनांची माहिती देण्यात आली. त्याचबरोबर विविध मंडळांच्या कार्यकर्त्यांच्या अडचणी, समस्या, निवेदने आणि तक्रारी प्रशासनाकडून ऐकून घेण्यात आल्या. बैठकीस गणपती मंडळे तसेच दहीहंडी मंडळांचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. मंडळांच्या वतीने उत्सवाच्या आयोजनादरम्यान येणाऱ्या विविध समस्या प्रशासनासम ोर मांडण्यात आल्या. यावेळी मिरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्त निखिल कौशिक, मिरा - भाईंदर महानगरपालिकेच्या महापौर डिंपल मेहता, महानगरपालिका आयुक्त राधाबिनोद शर्मा, पोलीस उपायुक्त राहुल चव्हाण यांच्यासह पोलीस विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

अधिकारी व लोकप्रतिनिधींनी मंडळांच्या प्रतिनिधींशी संवाद साधून त्यांच्या निवेदन व तक्रारी ऐकून घेतल्या. आगामी उत्सव शांततेत, सुरक्षित वातावरणात आणि प्रशासनाच्या नियमांचे पालन करून पार पाडण्यासाठी पोलीस व महानगरपालिका प्रशासनाकडून आवश्यक सहकार्य केले जाईल, असे यावेळी स्पष्ट करण्यात आले. या बैठकीमुळे गणेशोत्सव व दहीहंडी उत्सवाच्या नियोजनाला सुरुवात झाली असून, मंडळे आणि प्रशासन यांच्यात समन्वय वाढण्यास मदत होणार आहे.

## शिळगावातील तुळजाभवानी मंदिरात 'आईच्या वार' निमित्त महाप्रसादाचे आयोजन

### शेकडो भाविकांनी घेतला लाभ

**अक्षराज : विनोद वास्कर**



**दि.०१, शिळगाव, (ठाणे) :** दिनांक ०१ सप्टेंबर २०२६ रोजी सप्टेंबर महिन्याचा पहिला मंगळवार आणि आईचा वार असल्याने शिळगाव येथील श्री तुळजाभवानी मंदिरात महाप्रसादाचे भव्य आयोजन करण्यात आले होते. हा महाप्रसाद उत्तम आनंदा मोरे यांच्या वतीने करण्यात आला होता. यावेळी ठाणे महानगरपालिकेचे नगरसेवक शैलेश पाटील, मंदिर ट्रस्टचे सर्व सदस्य, गणेश टावरे, सुरेश आलिमकर, सुमित मोरे, सुदाम जाधव, सीमा सुरेश आलिमकर, रमेश भोईर, निलेश काठे, श्रावण माळी, प्रेमनाथ पाटील, तानाजी आलिमकर, जयेंद्र भोईर, दिलीप आलिमकर, आलिमकर परिवार आणि मोरे परिवार परिवार हे देखील मोठ्या संख्येने उपस्थित होते. आईच्या वाराचे औचित्य साधून आयोजित केलेल्या या महाप्रसादाचा शेकडो भाविक भक्तांनी लाभ घेतला. मंदिर परिसरात भक्तीमय वातावरण होते.

## शिरवळच्या रयत इंग्लिश मीडियम स्कूलच्या निलांश भिलारेची जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत बाजी




### मान्यवरांच्या हस्ते विशेष सत्कार

**अक्षराज : स्वप्निल जावळे**

**दि.०१, सातारा :** रयत इंग्लिश मीडियम स्कूल, शिरवळचा अत्यंत बुद्धिमान विद्यार्थी निलांश सचिन भिलारे हा सातारा जिल्ह्यातील सर्वात कमी वयातील FIDE-रेटेड बुद्धिबळपटू ठरला आहे. निलांशने आपल्या आई अश्विनी भिलारे व वडील सचिन भिलारे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि पाठिंब्यामुळे बुद्धिबळ क्षेत्रात ही मोठी झेप घेतली आहे. त्याने आतापर्यंत अनेक नामांकित बुद्धिबळ स्पर्धांमध्ये सहभाग घेतला असून आपल्या उत्कृष्ट कौशल्याच्या जोरावर नेत्रदीपक कामगिरी केली आहे. विशेषतः शालेय आणि जिल्हास्तरीय स्पर्धांमध्ये त्याने सातत्याने प्रथम क्रमांक पटकावला आहे. सातारा, खंडाळा, वाई, लोणंद, सोलापूर आणि सांगली अशा विविध जिल्ह्यांमध्ये व शहरांमध्ये आयोजित स्पर्धांमध्येही त्याने प्रथम क्रमांक मिळवून उल्लेखनीय कामगिरी केली आहे. नुकतीच सातारा येथे एक भव्य जिल्हास्तरीय बुद्धिबळ स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. दिनांक ३० ऑगस्ट २०२६ रोजी पार पडलेल्या या स्पर्धेत संपूर्ण जिल्ह्यातून विविध शाळांमधील शेकडो बुद्धिमान विद्यार्थी सहभागी झाले होते. या तीव्र स्पर्धेत निलांशने आपली कुशाग्र बुद्धिमत्ता, कमालीची एकाग्रता आणि अचूक डावपेच यांच्या जोरावर सर्व प्रतिस्पर्ध्यांवर मात केली आणि दिमाखात प्रथम क्रमांक पटकावला. निलांशच्या या दैदिप्यमान यशाबद्दल शाळेत एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी मेंबर आप्पासाहेब देशमुख, शाळेच्या मुख्याध्यापिका वर्षा मांढरे व पर्यवेक्षिका वासंती घाडगे यांनी निलांशचा जाहीर सत्कार केला. यावेळी मान्यवरांनी त्याच्या खेळाचे भरभरून कौतुक केले आणि त्याला आंतरराष्ट्रीय पातळीवर चमकदार कामगिरी करण्यासाठी व पुढील सर्व खेळांसाठी खूप खूप शुभेच्छा दिल्या. या यशामुळे निलांशवर सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.